

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र



ऑगस्ट २०२२ | वर्ष-१०, अंक-८ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४

## अनोख्या कल्पनेतून साकारलेल्या प्रशालेच्या प्रवेशद्वाराचे उदघाटन



*श्री. विकासराव वालावलकर प्रवेशद्वाराचे उद्घाटन करताना, सोबत (डावीकडून) लक्ष्मीकांत महाजन, पुष्कर मुणगेकर, श्रीकांत पराडकर, सुयोग काजरेकर, कल्पेश जुवेकर, प्रज्ञा पारकर, प्राजक्ता चाळके, शरयू यशवंतराव, पल्लवी तेंडूलकर आणि अन्य*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, डेरवण, सावर्डे या प्रशालेच्या अनोख्या कल्पनेतून साकारलेल्या प्रवेशद्वाराचे उदघाटन दि. २ जुलै २०२२ रोजी संस्थेचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते करण्यात आले.

शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या आणि त्यासाठी नवनवीन प्रयोग तसेच विविध उपक्रम प्रशालेत राबवण्याचा सातत्याने प्रयत्न करणाऱ्या या प्रशालेने आपली वेगळी ओळख रत्नागिरी जिल्ह्यामध्ये निर्माण केली आहे. अशा प्रशालेच्या प्रांगणात प्रवेश करतानाच इथे रुजवल्या जाणाऱ्या मूल्यांची जाणीव पालकांना आणि शाळेत शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला व्हावी म्हणून ही आधुनिक शिक्षण कमान निर्माण केली आहे.

ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाबरोबरच कला, क्रीडा आणि कौशल्य यांना प्राधान्य देण्याच्या संकल्पनेतून साकारलेल्या या प्रशालेचे प्रवेशद्वार अशाच आधुनिक मूर्त संकल्पनांचा आविष्कार करणारे आहे. शालेय जीवनाशी निगडित वेगवेगळे विषय या कमानीवर शिल्पाकृतींच्या आणि चित्रांच्या माध्यमातून साकारण्यात आले आहेत.



# डेरवण रुग्णालयात अत्यंत कठीण शस्त्रक्रिया यशस्वी

भ.क.ल.वालावालकर ग्रामीण रूग्णालय सावर्डे येथे नुकतीच एक मोठी शस्त्रक्रिया पार पडली आहे. खेड तालुक्यातील १५ वर्षीय मुलाला गेली दोन वर्षे नाकातून रक्तस्राव व नाक चोंदणे हे त्रास असल्याकारणाने तो रुग्ण वालावलकर हॉस्पिटलच्या 'कान नाक घसा' विभागाच्या ओपीडी मध्ये आला. 'कान नाक घसा' तज्ज्ञांनी सर्व आवश्यक तपासण्या (रक्त तपासणी, एम.आर. आय.) केल्यानंतर त्याचे निदान Juvenile Nasal Angiofibroma (JNA) 'जुवेनाइल नेसल एंजियोफाइब्रोमा' असे करण्यात आले. तरुण वयातील मुलांमध्ये आढळणारी रक्तवाहिन्यांची ही गाठ नाकातून साइनसमधून तसेच घसा व मेंदूच्या तळभागात पसरते. आपल्याकडील रूग्णामध्येदेखील ही गाठ बऱ्याच अंशी डोक्याच्या कवटीच्या तळभागापर्यंत पसरलेल्याचे आढळले (Infratemporal fossa upto right posterior etumoidal sinuses involving right medial & lateral pterygoid plates) या गाठीमुळे रुग्णाच्या चेहऱ्यावर सूज आली होती.

अशा गुंतागुंतीच्या केसचा विचार करता रुग्णाचे उपचार दोन टप्प्यांमध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रथम त्याला Preoperative Embolization of Vascular Tumor म्हणजेच गाठीभोवतीच्या रक्तवाहिन्या विशिष्ट प्रक्रियेतून साकळणे की ज्यामुळे गाठ आकाराने लहान व्हावी आणि दुसऱ्या टप्प्यात ४८ तासांच्या आत ती गाठ शस्त्रक्रिया करून काढणे (Endoscopic Resection of JNA). या दोन्ही टप्प्यात पूर्ण भूल देणे गरजेचे असल्याने तसेच अतिरक्तस्राव होण्याची शक्यता असल्याने प्रक्रिया जोखमीची होती. परंतु ई.एन.टी. तज्ज्ञ डॉ. शीतल धरणगुट्टे, इंटरव्हेंशनल रेडिऑलॉजिस्ट डॉ. अमीत साहू, भूलतज्ज्ञ डॉ. लिना ठाकूर आणि डॉ. वर्षा रिळकर तसेच हॉस्पिटल कर्मचारी यांच्यातील उत्तम समन्वयामुळे ही पूर्ण शस्त्रक्रिया यशस्विरित्या पार पडली आहे. दोन दिवसांत प्रत्येकी ४/५ तासांच्या दोन टप्प्यांमध्ये ही शस्त्रक्रिया पार पडली. अशा प्रकारची अत्यंत अवघड, जोखमीची आणि गुंतागुंतीची शस्त्रक्रिया कोकणात प्रथमच आणि तीही अत्यंत अल्प खर्चात करण्यात आली.

# उत्तम आरोग्याची हमी, सेवन करतो फळे-भाज्या आम्ही







मुलांचा जंक फूड खाण्याचा कल हल्ली वाढलेला आहे. मुलांना कुरकुरे, पिझ्झा, बर्गर, चॉकलेट असे पदार्थ आवडतात. परंतु असे पदार्थ आरोग्यासाठी हानिकारक असतात. शरीर निरोगी, सुदृढ ठेवण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी आहारात सर्व प्रकारच्या भाज्या व फळे यांचे सेवन असणे आवश्यक आहे. लहान मुलांना भाज्या व फळांविषयी माहिती व्हावी, त्यांचे रंग, चव यांचे ज्ञान मिळावे, त्यांच्या नावांची ओळख व्हावी आणि मुख्य म्हणजे मुलांमध्ये भाज्या व फळे खाण्याची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने 'एस.व्ही.जे.सी.टी.' इंग्लिश मिडियम स्कूल मधील पूर्व प्राथमिक शाळेत प्रतिवर्षाप्रमाणे नर्सरी आणि ज्युनिअर के.जी. च्या मुलांनी नुकताच Fruit Salad Day साजरा केला. यामध्ये मुलांनी वेगवेगळ्या फळांची नावे, फळांची माहिती व काही गाणी सादर केली. या वेळी मुलांना फळांविषयी सर्व माहिती व महत्त्व सांगण्यात आले. त्यानंतर Fruit Salad तयार करून मुलांना खाण्यासाठी देण्यात आले.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी सीनियर के.जी. च्या मुलांनी Vegetable Salad Day साजरा केला. या मुलांनीसुद्धा भाज्यांची नावे व त्याविषयी माहिती सादर केली त्याचप्रमाणे काही गाणी आणि भाजी विक्रेता व गिऱ्हाईक यांच्यामधील संवाद सादर केला. आरोग्यासाठी भाज्यांचे महत्त्व मुलांना पटवून देण्यात आले. मुलांच्या मदतीने Vegetable Salad तयार करून मुलांना खाण्यासाठी देण्यात आले. अशा प्रकारे या उपक्रमाद्वारे मुलांना फळे व भाज्या यांचे महत्त्व व आरोग्यासाठी होणारे फायदे याची माहिती मिळाली.

# आषाढी एकादशीनिमित्त ‘दिंडी’ आणि ‘अभंग गायन स्पर्धा’










श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटिज् ट्रस्ट इंग्लिश मिडियम स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स सावर्डे प्रशालेत भक्तिरसपूर्ण वातावरणात ‘देवशयनी आषाढी एकादशी’च्या निमित्ताने पूर्वप्राथमिक व प्राथमिक विभागाने ‘ दिंडी’, तर उच्च प्राथमिक व माध्यमिक विभागाची ‘अभंगगायन स्पर्धा’ संपन्न झाली. शाळेत पुन्हा एकदा विठ्ठलनामाचा गजर झाला आणि ‘कशाला जाता दूर, आमचे शाळेतच पंढरपूर’ याचा प्रत्यय विद्यार्थ्यांनी आपल्यात भक्तीभावातून करून दिला.

सर्व विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत आले होते. मुली नऊवारी साडी, परकर-पोलका या पोषाखात डोक्यावर तुळशी घेऊन होत्या, तर मुले सदरा-पायजमा, धोतर या वेशात गळ्यात तुळशीमाळा, हातात टाळ व खांद्यावर पालखी घेऊन वारकरी बनले होते.

बाहेर जोरदार पाऊस पडत असल्याने ‘Nursery School Garden’ मध्येच या चिमुकल्यांनी रिंगण तयार केले. या रिंगणामध्ये पूर्व-प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांचा अभंग, पांडूरंगाची गाणी आणि विठ्ठल नामघोषात दिंडी सोहळा उत्साहात पार पडला. त्यानंतर या छोटया वारकऱ्यांना लाडूप्रसाद देण्यात आला.

तसेच प्राथमिक शाळेचे विद्यार्थी टाळमृदंगाच्या गजरात, हातात भगव्या पताका फडकवत, ग्यानबातुकारामांच्या नामघोषात ठेका धरत या दिंडीत तल्लीन झाले होते. विठ्ठल-रखुमाई, अनेक संत तसेच वारकरी यांच्या पोषाखात आलेल्या विद्यार्थ्यांनी शालेय परिसरातून दिंडी काढली. गोल रिंगण करून पारंपारिक खेळाचे प्रात्यक्षिक केले. चिमुकल्या मुलींचा फुगड्यांचा खेळही रंगला होता.

उच्च प्राथमिक व माध्यमिक विभागात इयत्ता ६ वी, ७ वी असा एक गट व इयत्ता ८ वी ते १० वी असा दुसरा गट अशा दोन गटात ही अभंगगायन स्पर्धा घेण्यात आली. प्रथेप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले व इयत्ता सहावीच्या मुलांनी रूपक सादर करून स्पर्धेला सुरूवात झाली.

आबालवृद्धांचे आराध्यदैवत असलेल्या या परमात्मा विठुरायाच्या सेवेची जणू सुवर्णसंधी शाळेने उपलब्ध करून दिली असल्याने विद्यार्थ्यांमध्ये आठवडाभरापासूनच अभंग पाठांतर, शब्दांचे शुद्ध उच्चारण, योग्य चाल यांची रंगीत तालीम चालू होती. त्यामुळे प्रत्यक्ष आषाढीवारीत सहभागी न होता आल्याची हुरहुरच प्रशालेने मिटवून टाकली.

शालेय गणवेश परिधान करूनही वारकरी म्हणून नटण्याची, सजण्याची प्रचंड लगबग विद्यार्थ्यांमध्ये दिसत होती. अगदी पंढरपुरात लावतात तस्साच टिळा लावता यावा, यासाठी सायकलच्या स्पोकपासून तो आकार साकार करणे असो, की एकाने देवघरातील गंध तर दुसऱ्याने पूजासाहित्यातील आणलेला अबीर असो, क्षणार्धात सगळे एकसमान विठूचे वारकरी अभंग गायनासाठी सज्ज झाले.

यानंतर अनुक्रमे इयत्ता सहावी पासून दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आपापली अभंगसेवा सादर केली. विद्यार्थ्यांनी अतिशय मनापासून अभंग पाठ केले. फक्त पाठच केले नाहीत तर, त्यातील शब्दांचा भाव, आरोह-अवरोह, ताल, सूर, लय या प्रत्येक निकषाला शतप्रतिशत न्याय दिल्याने, ही स्पर्धा एका परमोच्च शिखरावर पोहोचली व लांबच-लांब चंद्रभागेच्या अथांग

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५ ६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

पात्राप्रमाणे अभंगमाला अखंड चालू होती. परंतु स्पर्धा म्हटली की, स्पर्धेचे नियम, सादरीकरण आणि जय-पराजय हे त्या संदर्भाने आलेच.

इयत्ता ६ वी आणि इयत्ता ७ वी च्या गटात ७ वी 'ब' या वर्गाने सादर केलेला 'देव माझा माझा' या अभंगाला प्रथम क्रमांकाचा मान मिळाला, तर ६वी 'अ' चा 'विठू माऊली' आणि ६वी 'ब' चा 'कांदा मूळा भाजी' या अभंगाना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त झाले.

इयत्ता ८ वी ते १० वी च्या गटात १०वी 'ब' या वर्गाने सादर केलेला 'अबिर गुलाल' या अभंगाला प्रथम क्रमांकाचा मान मिळाला तर ९वी 'ब' चा 'तुकोबांची अमृतवाणी' आणि ८वी 'अ' चा 'विठूरायाची नगरी' या अभंगांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त झाले.

या अभंगगायनात सर्व जातीधर्मांतील विद्यार्थी आणि विद्यार्थीनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतल्यामुळे 'सर्वधर्मसमभाव' हे मूल्य केवळ पुस्तकापुरतेच मर्यादित न राहता त्याची प्रत्यक्ष अनुभूती या निमित्ताने आली. प्रत्यक्ष वारीच्या परंपरेला अनुसरून ज्या-ज्या गोष्टी असाव्यात, असे वारकरी संप्रदायाचे संकेत आहेत; त्याप्रमाणे भगवी पताका, तुळस, कपाळी गंध, टाळ-मृदुंगाचा गजर, इत्यादी सर्व निकषांनी परिपूर्ण अशी अभंगगायन स्पर्धा भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. वर्गवार सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांची उत्तम तयारी करून घेतली. या अभंगगायन स्पर्धेचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी कनक पाटणकर व वरदा सावंत ह्यांनी केले.

## डेरवण येथे आठवी 'भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर स्मृती दौड -२०२२' बुधवार, दि. २३ ऑगस्ट २०२२ रोजी

श्री विठ्ठलराव जोशी चारिटीज ट्रस्टतर्फे डेरवण येथे सलग आठव्या वर्षी बुधवार दि. २३ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ८ वाजता भव्य क्रॉस कंट्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेदरम्यान विजेत्या खेळाडूंना एकूण ५५,०००/- रुपयांची रोख पारितोषिके, पदके आणि प्रशस्तीपत्रके देवून गौरविण्यात येणार आहे.

ही स्पर्धा १२/१४/१६/१८ वर्ष वयोगटातील मुले व मुलींसाठी आयोजित केली असून १२ वर्ष वयोगटातील मुले व मुली यांना २ किलोमीटर, १४ वर्ष वयोगटातील मुलांसाठी ३ किलोमीटर व मुलींसाठी २ किलोमीटर, १६ वर्ष वयोगटातील मुलांसाठी ४ किलोमीटर व मुलींसाठी ३ किलोमीटर तसेच १८ वर्ष वयोगटातील मुलांसाठी ६ किलोमीटर व मुलींसाठी ४ किलोमीटर अंतर असणारी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

तसेच सर्व सहभागी खेळाडूंना संस्थेकडून टी शर्ट देऊन गौरविण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून बलोपासना आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात आले आहे. सदर स्पर्धेतील आपला सहभाग नोंदविण्याची अंतिम तारीख २० ऑगस्ट ही असून अधिक माहिती करता ९८२२६३९३०६ / ९८२२००१६९२ / ९८५०८८३२८३ / ८८०५२२८९२२ / ९३२५८९७८७७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०